# बार्टीच्या ऑनलाइन एमपीएससी मार्गदर्शन वर्गांना राज्यभरातून प्रतिसाद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) सुरू करण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या विनामूल्य ऑनलाइन प्रशिक्षणासाठी राज्यभरातील उमेदवारांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. ऑनलाइन मार्गदर्शनासाठीच्या यु-ट्यूब वाहिनीचे ७७ हजारांपेक्षा जास्त सदस्य झाले आहेत.

करोना विषाणू संसर्गामुळे स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन वर्ग बंद आहेत. तसेच गावी अडकलेल्या उमेदवारांना आर्थिक अडचणी आहेत. या पार्श्वभूमीवर उमेदवारांना मार्गदर्शन मिळण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष साहाय्यमंत्री धनंजय मुंडे, राज्यमंत्री विश्वजित कदम यांनी बार्टीचे महासंचालक कैलास कणसे यांना ऑनलाइन प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याची सूचना केली होती. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाचे सचिव पराग जैन-नानुटीया यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बार्टीने ऑनलाइन प्रशिक्षण सुरू केले आहे.

राज्यभरातील सुमारे ९० हजारांहून अधिक उमेदवारांनी या प्रशिक्षणासाठी अर्ज केला. २४ जुलैपासून प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले. फेसबुक आणि यु-ट्यूबवर हे वर्ग दाखवले जात असल्याने दीड लाखांपेक्षा जास्त उमेदवार त्याचा लाभ घेत आहेत. आतापर्यंत ७ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यु-ट्यूबवर मार्गदर्शक चित्रफिती पाहिल्या आहेत. तर वाहिनीचे ७७ हजारांहून अधिक सदस्य झाले आहेत. डॉ. शैलेश कोळेकर, प्रा. संतोष वट्टमवार, डॉ. किरण देसले, सतीश पाटील, विवेक पाटील, राहुल देशमुख मार्गदर्शक आहेत. रोज सकाळी आठ ते बारा या वेळेत बार्टी एमपीएससी ऑनलाइन या यु-ट्यूब वाहिनीवर मार्गदर्शन होत असल्याची माहिती कणसे यांनी दिली. या प्रशिक्षणासाठी स्पर्धा परीक्षा विभागाचे प्रकल्प संचालक कुणाल शिरसाठे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रकल्प संचालक प्रशांत बुद्धिवंत, प्रकल्प अधिकारी दयानंद धायगुडे, नरेश जगडे हे समन्वयाचे काम करत आहेत.

### यूपीएससी, आयबीपीएसचेही ऑनलाइन मार्गदर्शन

एमपीएससीच्या वर्गांना मिळालेल्या प्रतिसादामुळे आता यूपीएससी आणि आयबीपीएसचेही ऑनलाइन मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बार्टीच्या ऑनलाईन प्रशिक्षणाला उत्स्फुर्त प्रतिसाद

**अमरावती/ का.प्र.**

कोरोना आजाराच्या प्रादुर्भावामुळे प्रशिक्षण वर्ग बंद आहेत. त्यामुळे स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर बार्टी पुणे मार्फत ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभत आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने धनंजय मुंडे, राज्यमंत्री विश्वजित कदम, बार्टीचे महासंचालक कैलास कणसे आदिंच्या सूचनानुसार सामाजिक न्याय विभागाचे सचिव पराग जैन, नानेटिया यांच्या मार्गदर्शनात ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. समाज माध्यमाच्या सहकार्याने प्रशिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. सुमारे ९० हजार उमेदवारांनी या प्रशिक्षणासाठी अर्ज सादर केले. तर युट्युब व फेसबुकच्या माध्यमातून दीड लाखांपेक्षा अधिक उमेदवार प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत. प्रशिक्षणात इतिहासकार डॉ. शैलेश कोळेकर, डॉ. चैतन्य कांबळे, प्रा. संतोष मद्दमवार, डॉ. किरण बेसले मार्गदर्शन करित आहेत. तर प्रशासकीय अधिकारी सतीश पाटील, विवेक पाटील व राहुल देशमुख सुध्दा मार्गदर्शन करतील. युपीएससी व आयबीपीएस परिक्षेच्या उमेदवारांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन बार्टीचे निबंधक यादव गायकवाड, प्रकल्प संचालक कुणाल शिरसाठे, प्रशांत बुध्दीमंत, प्रकल्प अधिकारी दयानंद धायगुळे, नरेश जपडे आदिंनी केले आहे.

## अभ्यासाची गती वाढली

बार्टीच्या उपक्रमामुळे अभ्यासा ची गती वाढली. पीएसआय व एसबीआय प्रशिक्षणाही सुरू करावे. तसेच प्रिलीम्स व मेन्स दोन्ही परिक्षांचे मार्गदर्शन उपलब्ध झाल्यास फायदेशीर ठरेल.

**सोपान इंगळे**

## शहराची वाट धरावी लागणार नाही

महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घरीच उत्तम मार्गदर्शन लाभत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी शहराची वाट धरावी लागणार नाही. महाराष्ट्र शासन व बार्टीचे आभार.

**धिरज थापड**